# प्रकरण - ३

# 'दैना' कादंबरीचे स्वरुप

# प्रकरण –३

## 'दैना' कादंबरीचे स्वरुप

पारधी समाजावर आधारित 'दैना' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी होय. या कादंबरीचे लेखक भास्कर भोसले हे असून त्यांनी आपल्या समाजाच्या आणि स्वत:च्या दुख:द अनुभवांची मांडणी या कादंबरीत केलेली आहे. या कादंबरीचा लेखक कादंबरीमध्ये सतत वावरताना दिसतो. स्वत:च्या जन्मापासून ते त्यांनी आतापर्यंत केलेल्या वाटचालीचे अनुभवकथन कादंबरीच्या रूपाने केलेले आहे. कादंबरी हा वाङ्मय प्रकार समाज वास्तवाशी निगडित असला तरी त्यातील अनुभव विशिष्ट स्थळी, विशिष्ट काळात अथवा विशिष्ट व्यक्तीच्या जीवनातील असतीलच असे नाही. वास्तववादी कादंबरीकार समाजातील वास्तवाच्या विखुरलेल्या घटना आणि अनुभव वास्तवामध्ये नसलेल्या व्यक्तिरेखांच्याद्वारे मांडण्याचा प्रयत्न करत असतो. त्यामुळे कादंबरीकाराने मांडलेले जीवनानुभव सामाजिक वास्तवाशी निगडित असले तरी ते अनुभव विशिष्ट व्यक्तित्वाशी लावता येत नाहीत. म्हणूनच 'ॲलँ रॉब ग्रिये' या फ्रेंच कादंबरीकराने म्हटले आहे की, ''कादंबरीकार कोणत्याही वास्तवाची नक्कल करत नसतो. तर तो रचना करत असतो. नवे निर्माण करत असतो. व ते निर्माण करताना त्याच्यापुढे कसलेही मॉडेल नसते.''[१]

ग्रिये यांचे हे वरील मत विचारात घेता कादंबरीतील वास्तव हे प्रत्यक्ष वास्तव नसून कादंबरीकाराने केलेली ती वास्तवाची नवनिर्मिती असते. हा त्यांनी केलेला युक्तीवाद पूर्ण रूपात मान्य करता येणार नाही. विशेषत: दलित कादंबरी प्रामुख्याने उपेक्षित अशा दलित, आदिवासी, भटके–विमुक्तांच्या जीवनातील सामाजिक व सांस्कृतिक अनुबंधानी साकार झालेली असते. त्यात जीवनाची नक्कल नसली तरी विविध वास्तवाची स्पंदने आणि समस्या या वास्तवाच्या प्रतिकृतीच

असतात. यातही आत्मचरित्रात्मक कादंबरीसाठी कल्पनाजन्य घटनाप्रसंग मांडणी शक्य नसते.

कादंबरीकार आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहित असताना त्याला वास्तवाचे भान ठेवणे अपरिहार्य असते. त्यामुळे स्थळ, काळ आणि व्यक्तिरेखा याद्वारे जिवंत सामाजिक अनुभव प्रत्ययास येतात. व्यक्ती, सामाजिक समूह, घटनाप्रसंग, वातावरण, सामाजिक समस्या, भाषा आणि संस्कृती याला वास्तवाचा भक्कम आधाार असल्याशिवाय चरित्रात्मक कादंबरीचा पट साकार होऊ शकत नाही. आत्मचरित्र आणि आत्मचरित्रात्मक कादंबरी यात नेमका फरक मांडताना एवढेच स्वातंत्र्य कादंबरीकार घेऊ शकतो की, हा कादंबरीकार जीवनातील संपूर्ण बऱ्या-वाईट घटनांची मांडणी करण्याऐवजी काही विशिष्ट घटना प्रसंगांची निवड करून त्या विशिष्ट घटनाप्रसंगावरच कादंबरीचा आशय अविष्कृत करू शक्तो. आत्मचरित्रकारांना विशिष्ट हेतु आणि प्रेरणा गृहित धरूनही सुख-दु:ख आणि जीवनातील बरे-वाईट अनुभव टाळता येणे शक्य नसते. भास्कर भोसले यांची 'दैना' ही कादंबरी आत्मचरित्रात्मक असल्यामुळे या कादंबरीत स्वत:च्या जीवनातील विविध दु:खद अनुभव मांडलेले आहे. विशेषत: सामाजिक अत्याचाराची दु:खद मालिका कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. सुखी जीवन जाणिवपूर्वक गैरमार्गी आणि अनैतिक व्यवहाराकडे झुकत असते. दुख:चा अवडंबर अशा मार्गाकडे जाण्यासाठी अडथळा ठरत असतो. चैनीखातर इतर मार्गाचा अवलंब करणे, दु:खी जीवनाच्या कक्षेत येत नाही. चैनीऐवजी काही वेळा अत्यावश्यक गरज म्हणूनच अशा मार्गाकडे जाणे काही वेळा अपरिहार्य ठरते. असे अनुभव या कादंबरीतून लेखकाने सर्वत्र मांडलेले आहे. भास्कर भोसले हा तसा मान्यता प्राप्त लेखक नाही. नव्यानेच वाङ्मयक्षेत्रात त्यांनी पदार्पण केले आहे. त्यांच्या नावावरती तीन कविता संग्रह आणि 'दैना' ही कादंबरी याच्यासह चार साहित्यकृती एवढीच त्यांची वाङ्मयनिर्मिती

आहे. कवितेपेक्षा कादंबरीला आत्मचरित्राचे संदर्भ असल्यामुळे ही कादंबरी अधिक वास्तववादी झालेली आहे.

भास्कर भोसले यांनी 'दैना' कादंबरीतून पारधी समाजाची दैना मांडलेली आहे. स्वत: भोसले हे पारधी समाजात जन्मलेले तरुण आहेत. तेच सदर कादंबरीतील मुख्य पात्र होत. त्यामुळे या कादंबरीतून त्यांचा जीवनवृत्तांत आलेला आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून ते आज उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालयात सेवक या पदावर काम करत आहेत. त्यांनी ग्रंथालयातील अनेक लेखकांची आत्मकथने वाचली व आपल्या जीवनातील दु:ख, वेदना याविषयी त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, या कादंबरीच्या रूपाने मांडल्या आहेत.

भास्कर भोसले हे या कादंबरीची सुरूवातच कानगावातील रात्रीच्या एका भयानक प्रसंगापासून करतात. लेखकाचे वडील ज्ञानबा त्या रात्री आलेल्या चोरांना पळवून लावतात. तेव्हापासून गावामध्ये त्यांचा दबदबा वाढतो. वडिलांमुळे गावाला एक चांगला राखणदार पारधी लाभतो. त्या राखणदारीतून मिळणाऱ्या बलुत्यामुळे लेखकाचे कुटुंब खाऊन-पिऊन सुखी असे. लेखकाची धोंडी नावाची आजी आणि सदुबा नावाचे आजोबा यांच्या शब्दाबाहेर कधीही न जाणाऱ्या लेखकाच्या वडिलांची प्रसिद्धी पोलिसांपर्यंत जाते. तेथून पुढे डोके या हवालदाराशी वडिलांची झालेली मैत्री आणि नंतर डोकेची झालेली बदली, त्यामुळे वडिलांचा सख्खा मित्र हरपतो. सदु काळे हे आईचे वडिल पारध्यांचे पाटील होते. त्यांच्याबरोबर शिल्लकदार भोसले, मिया शिंदे आणि इतर वृद्ध पंच मंडळी होती. एकदा काही प्रकरणे, गावकीच्या वाटण्या आणि देवचोरीवरून जात-पंचायत भरलेली असते. त्यामध्ये सर्व नातेवाईकांना गावे वाटून दिली जातात. त्यानुसार आपापल्या गावची राखण इमाने-इतबारे करणे, व ते गाव सोडून दुसऱ्या गावात मागून खाणे हा

नियमभंग समजला जातो व सर्वजन तशी शपथ घेतात. लेखकाचे वडील आपल्या पत्नीच्या माहेरी कानगावातच राहिले होते. आजोबा थकल्यामुळे न्यायनिवाड्याची सूत्रे लेखकाच्या वडिलांकडे सोपवण्यात येतात.

लेखक भोसले यांचे नाव पहिलीच्या वर्गात घालत असताना त्यांच्या आईला त्यांची जन्मतारीख माहित नसते. त्यामुळे सोनवणे गुरूजीच त्यांची जन्मतारीख घालतात. त्या काळात इंदिरा गांधी पंतप्रधानपदी होत्या, तेव्हा कुटुंबनियोजनासाठी गाड्या घरी येत असत. पण भोसलेंचे अज्ञानी आई-वडील आणखी एका मुलीच्या हव्यासापोटी महिनाभर शेतातील काटवनात लपून बसतात. त्यामुळे सर्व भावंडांची खाण्यासाठी आबाळ होत असे, तेव्हा भूक भागविण्यासाठी कापसाची कोवळी बोंडे त्यांना उपयोगी पडत असत. तेव्हा लेखक म्हणतो, 'रडरड रडायचो पण हुंदक्याचा आवाज दुसऱ्यापर्यंत पोचलाच नाही.' पारधी जमातीत जन्म झाल्यामुळे कशी उपेक्षा झाली याची वेदनाच लेखक शब्दांकित करतो. या दु:खद अनुभवाप्रमाणेच भावंडासोबत घडलेल्या अनेक गमती-जमती, कारुण्यमय प्रसंगही या कादंबरीत आले आहेत. एकदा लेखक आपल्या भावंडांच्या मागे लागून कॅनॉलच्या टाकीवर गेल्यामुळे तुकाराम हा भाऊ त्याच्या लहान भावांना दगडाने ठेचतो व हातपाय बांधतो, भुकेने जीव कासावीस होऊन साखरेच्या डब्यातील साखर घेताना डब्याजवळ बसलेला साप, भावांसोबत लहानपणी घरातील भांडी चोरून विकायला जाताना झालेली केविलवाणी अवस्था इ. अनेक प्रसंग मांडले आहेत. कादंबरीचा नायक तिसरीत असताना त्यांच्या 'अनिल' नावाच्या भावाचा जन्म होतो. तो अंगापिंडाने वयापेक्षा दुप्पट दिसत असे. त्यांच्याच परिवाराचा एक सदस्य असलेली 'भुंडी' ही गाय, तिचा घरातील सर्वांना लळा लागलेला असतो. ती गाय जेव्हा शिकवल्याप्रमाणे वर्तन करत नाही, तेव्हा ती सरळ कसायाला विकली जाते. त्यामुळे घरदार दु:खात बुडते. त्याचवेळी त्यांच्या घराजवळ भिल्ल लोक पाले

ठोकून राहतात. त्यांची सुंदर असलेली गाय वडील विकत घेऊन मोठ्या रुबाबात मिरवत असतात. मात्र आठ दिवसातच हे भिल्ल लोक सगळीकडे उन्मात करतात, रातोरात चोऱ्या, दरोडे घालतात. त्यांच्यामध्ये पोलिसांना हवा असलेला मांगल्या पारधी हा मोठा दरोडेखोरही असतो. हे भिल्ल-पारधी आसपासच्या शेतामध्ये लूट करून पहाटे कोणालाही सुगावा लागू न देता चोरी केलेला माल बाजारात विकत असत. आणि गरीब पारध्यांवर त्याचा रोष ओढवला जात असे. असाच रोष पुढील काळात लेखकाच्या वडिलांवर ओढवला गेला.

लेखकाचे वडील गावाची राखण प्रामाणिकपणे करत असल्यामुळे चोरी करणाऱ्या गारुडी, गोपाळ यांचा रोष ओढवला जाई. त्यापैकी गोपाळ लोक संधी साधून वडिलांच्या खुनाचा प्रयत्न करतात. पण त्यातून वडील वाचतात. शाळेसाठी लेखकाचे सहा-सात कोस पायी चालत जाणे, शाळेतील नवीन बाईंची मुलांनी केलेली टिंगल, त्याचे प्रत्युत्तर, शाळेत असणाऱ्या मामांच्या मुलांबरोबर लेखक व त्याच्या भावंडांची भांडणे, अत्यंत बिकट परिस्थितीतही लेखकाने वार्षिक परीक्षेत मिळवलेला पहिला नंबर, दारुच्या भट्टीसाठी सरपन तोडण्याचे काम करणारी भावंडे, त्याचबरोबर राहत असलेल्या जागेवरून वारंवार स्थलांतर करावे लागणे, त्यामध्येच भर म्हणून एका अंध बहिणीचा जन्म होणे, काही दिवसांनी लेखकाच्या टाक नावाच्या मामाचा अचानक झालेला मृत्यू, आणि त्या मृत्यूचा वडीलांवर झालेला आरोप, त्याचा परिणाम मामाच्या मुलांकडून लेखक व त्याच्या भावंडांना होणारा त्रास, त्यातून त्यांना गाव सोडण्यास परावृत्त करणे, पुढे शेजारील घरावर झालेल्या दगडफेकीचा लेखकाच्या वडिलांवर केलेला आरोप, त्यावेळी जेवणाच्या ताटावरून वडिलांनी काढलेला पळ इ. जीवनाला कलाटणी देणाऱ्या अनेक कडवट घटना लेखकाच्या जीवनात घडतात. या सर्वातून सुटका करून घेण्यासाठी भोसलेंचे वडील आपले बिऱ्हाड कडा कॉलनीत उतरवतात. परंतु तेथे राहायला येणार हे कळताच

लेखकाची बेस्टा ही मावशी व आजी त्यांचे कडाक्याचे भांडण काढतात, धिंगाणा घालतात. तेव्हा आजीच्या सांगण्यानुसार वडील ती जागा सोडतात. एकामागून एक संघर्षमय प्रसंगातून हे कुटुंब जगण्याचा प्रयत्न करत असते. इतक्या घडामोडी घडूनही लेखकाच्या शाळेत मात्र खंड पडत नाही. सदर वर्षी धान्य भरपूर झाल्यामुळे सपूर्ण पाल धान्यानीच भरते. म्हणून घरातील सर्व पालाबाहेर झोपत असतात. पण एके दिवशी तुफान गारपीठ होते. त्यामुळे पालाच्या चिंध्या होतात. पालामध्ये चिखल झाल्यामुळे लेखकाचे कुटूंब तसेच संपूर्ण मळ्यातील लोक शेजारी दत्तोबा शेलारांच्या घरी झोपायला जातात.त्यावेळी गारपीठाच्या गप्पा, गोष्टी, हशा, धिंगाणा, ढोल, लेझीम, रात्रीची भजने, इ. सर्व गोष्टी महिनाभर चालतात. त्यानंतर लेखकाला पाटस शाळेतून दौंडला शाळेत घातले जाते. तेथे वसतिगृहातील वातावरण, अपुऱ्या सोयी, तेथील किळसवाण्या गोष्टींचा लेखकाला उबग आल्यामुळे तो घरी पळून जातो. परंतु वडिलांच्या धाकामुळे पुन्हा वसतिगृहात जातो. दिवाळीच्या सुट्टीमध्ये आल्यावर लेखक शेतामध्ये खुरपणीला जात असे. त्यावेळी शेजारील सुनंदा या मैत्रिणीसोबत अनेक कष्टाची कामे तो करतो. दिवाळीचा सण मागण्यासाठी तो बहिण गोदाबरोबर जातो. त्यावेळी गोदाकडे कामुक नजरेने बघणारे पुरुष, विनयभंग करणारी माजोरी मुले, आलेले अपमानाचे वाईट प्रसंग यांचा सामना त्यांना करावा लागतो. अशातऱ्हेने दिवाळीची सुट्टी संपल्यावर मागून आणलेल फराळ घेऊन लेखक वसतिगृहात परत जातो. तेव्हा तेथे मित्रांचे फराळ चोरणे, एक वेळचे जेवण करावे लागणे, रात्री डास व ढेकणांचा होणारा त्रास, मुलांचे अश्लिल वागणे यांसारख्या विचित्र अनुभवांना लेखकाला सामोरे जावे लागते. त्यानंतर लेखक अभ्यासात रममान होऊन रसवंती गृहात काम करून शिकू लागतो. तेथे काम करताना लेखकाला तमाशा पाहणे, क्रिकेट पाहणे इ. छंद जडतात. वसतिगृहात जेव्हा जेवण मिळत नसे त्यावेळी लग्नसराईत जाऊन लेखक

आपली भूक भागवित असे. दरवर्षी लेखकाचे घरी येणे, काम करणे, व परत निघून जाणे असा क्रम सुरू असतो.

अचानक खूप दिवसांनी लेखकाचे चुलते भाऊसाहेब येतात. पण वडिलांची भेट न घेताच जातात. चुलते मद्यपान करून स्टेशनवर पडले असल्यामुळे पोलिस त्यांना पकडतात. त्यांना सोडविण्यासाठी वडील जाणार त्याच्या आधी एक दिवस पोलस वडिलांना सापळा रचून पकडतात. तेव्हा काहीतरी आरोप ठेऊन पाच हजार रुपये किंवा जामीनाची मागणी करतात. तेव्हा जामीन मीळवण्यासाठी लेखकाच्या आईला खूप फिरावे लागते. तेव्हा दोन लोक पैसे घेऊन जामीन होतात. कोर्ट-कचेरी करून वडिलांना सोडवून आणण्याकरता लेखक व त्याची भावंडे काम करून बऱ्यापैकी पैसे जमवतात. त्यावेळी घरामध्ये कलह सुरू होतो. सहा महिन्यांनी लेखकाच्या वडिलांवर खिसेकापूचा आरोप होतो. या सर्व प्रकरणांचा परिणाम लेखक नववीच्या वर्गात नापास होण्यात होतो. नापास झाल्यामुळे त्याला इतरत्र शाळेत प्रवेश मिळत नाही. त्याच गावात आठवीचा वर्ग असतो. तेथे पुन्हा आठवीपासून दहावीपर्यंत जातो. तेथून पुढे पोलिस लेखकाच्या घरी वारंवार येऊ लागतात. त्यामुळे त्यांचे कुटुंब भवरापूर, पिंपरी, सांडस या गावी महिनाभर निघून जाते. तेव्हा पोलिसांचे त्रास देणे कमी होते. या कालावधित लेखकाला आणखी एक बहिण होते. त्यामुळे त्यांच्या गरिबीमध्ये आणखी भर पडते. पण तेथून पुढे लेखकाच्या घरावर संकटांचे सत्र सुरू होते. रात्री-अपरात्री पोलिस येऊ लागतात, चौकशी करू लागतात. त्यामुळे गावामध्ये लेखकाच्या वडिलांची पत कमी होते. इतरांनी केलेल्या गुन्ह्याचा आरोप लेखकाच्या वडिलांवर ठेऊन पोलिस त्यांना नेऊ लागतात. त्यावेळी कराव्या लागणाऱ्या कोर्ट-कचेरीमध्ये सर्व पैसा संपून जातो. झोपताना, उठताना, जेवताना पोलिसांच्या भितीने हैराण झाल्यामुळे सर्व भावंडांना घरी न राहण्याचा सल्ला आई देते. याच कालावधित भिल्ल पारधी समाजातील कुटुंबात

भोसलेंचे कुटुंब काही दिवस घालवतात. त्यानंतर आपल्या नातलगाच्या हातात बेड्या पाहून रडणारे पारधी, पोलिसांना भिऊन रडणारे पारधी, वकिलाच्या मागे पैसे घेऊन पळणारे पारधी अशी पारधी समाजाची दैना पाहून लेखकाच्या मनामध्ये प्रश्नांचे वादळ उठते. तेथून पुढे पोलिसांचा ससेमिरा नेहमीच लेखकाच्या घरी लागतो. एके दिवशी पोलीस पकडायला येतात तेव्हा लहान भावासह कुटुंबातील सर्व सदस्यांची झालेली पळापळ, त्यामध्ये लहान भाऊ हरवणे व दुसऱ्या दिवशी सकाळी परत येणे यांसारखे प्रसंग कुटूंबाला झेलावे लागत असत. पोलिसांच्या हाती घरातील एखादी व्यक्ती लागली तर नाहक शिक्षा भोगावी लागेल म्हणून लेखकाची आई, बहिण गोदा व अंध बहिण यांना घरी ठेऊन जड अंत:करणाने सर्वजण दुसरीकडे राहण्यास जातात. कधी कच्ची कणसे तर कधी हुरडा खात, कधी बांधामध्ये, कधी ढेकळामध्ये तर कधी शिवारामध्ये संसार थाटतात. त्यावेळी झालेली उपासमार, लहान बहिणीचे दुधाविणा रडणे, हिंसक प्राण्यांची भिती, पोलिसांची भिती यामुळे सहा महिने तिथेच कसेबसे ते जीवन कंठतात. पुन्हा घरी परतात पण पोलिसांच्या खेपा चालू असलेल्या पाहून पुन्हा निवाऱ्याच्या शोधात इतस्तत: भटकतात. त्यात जातभाई त्यांना राहू देत नाहीत. अनेकांचा वडिलांवर रोष असल्यामुळे त्यांना आसरा मिळत नाही. गैरसमजामुळे वडिलांच्या सासरची मंडळी लेखकाच्या कुटुंबाशी वैर धरतात. आणि तेथून पुढे अनेक गोष्टींमध्ये त्यांना अडथळे आणतात. याच काळात जाधव या व्यक्तिच्या कुटुंबाशी लेखकाच्या कुटुंबाचे नाते जडते. तेथून पुढे भावाच्या व वडिलांच्या तारखेसाठी पेसे पुरविणे, त्यांच्यायाठी जामीन देणे, प्रवासाचा खर्च, आणि लहान भावांच्या शिक्षणासाठी कोठेतरी काम करून लेखक पैसे जमा करत असे. त्याच काळात रतन टिळेकर हा मित्र लेखकाला भेटतो. त्याच्या सहवासात लेखक आपले दु:ख विसरून जातो. त्यानंतर आजोबांची जमीन ताब्यात घेण्यासाठी लेखक प्रयत्न करू लागतो. तलाठी

ऑफिस ते मामलेदार कचेरी आणि कचेरी ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे माराव्या लागणाऱ्या फेऱ्या, सर्व कागदपत्रे जमा करणे, करावी लागणारी पायपीट, पण जातीचा दाखला नसल्यामुळे खूप पैसे खर्च करूनही दाखला मिळत नाही. तेव्हा लेखक निराश होतो. आपल्या जमिनीत गुप्तधन असल्याचे त्याला वडिलांकडून समजते. आणि लेखक मित्र रतन टिळेकरच्या सहाय्याने पैसे जमवून देवऋषी, होम, पुजा वगैरे अनेक गोष्टी करतात. पण तेथेही निराशा होते. त्याच कालावधित लेखकाचा भाऊ बापुची पत्नी घारी हिच्या आगमनाने घरामध्ये विविध प्रसंग उद्‌भवतात. घरामधील भांडणे, शेजारील मुलांची दगडफेक, बापूचे वागणे, लेखकाशी तिचे अनैतिक संबंध ठेऊ पाहणे व नकार मिळताच सर्व घराला त्रास देण्यासाठी अनेक कारस्थाने रचने. द्याज म्हणजेच हुंड्यासाठी सारखे माहेरी जाणे, त्यामुळे लेखकाचा भाऊ भ्रमिष्टासारखा वागू लागतो. गावकऱ्यांच्या मनामध्ये त्याच्याविषयी भिती निर्माण होते. बापुच्या अशा या वागण्यामुळे एक प्रसंग असा निर्माण होतो की, गावकरी लेखकाच्या कुटुंबाला गाव सोडून जाण्यास भाग पाडतात. तेंव्हा रडवेल्या अंत:करणाने सर्व कुटुंब आसरा मिळेल तेथे चारी दिशांना राहू लागतात. या सर्वामध्ये मुलांच्या शिक्षणात खंड पडू दिला जात नाही. अशाही परिस्थितीत लेखक कवीसंमेलनाचे निमंत्रण स्वीकारून तडजोड करून पुण्याला आपली कविता सादर करतो. आसरा मिळवण्यासाठी लेखकाची आई व भावंडे बेस्टा मावशीकडे जातात. पण पोलिसांना ही गोष्ट कळल्यामुळे ते मावशीच्या नवऱ्याला पोलिस स्टेशनमध्ये ठेवतात. आणि लेखकाच्या कुटुंबाला स्वाधीन करण्याची मागणी करतात. तेव्हा मावशीच्या आग्रहास्तव ते पळून जाऊन डोंगराचा आधार घेतात. तेथे हिंस्र पशूंच्या सान्निध्यात, त्यांच्यापासून बचाव करतच उदरनिर्वाहाची सोय करणेही त्यांना भाग पडते. तेथे लेखक एमआयडीसीला सुतार काम करून सर्वांचे पालन-पोषण करतो. येथे मिळत असलेल्या बऱ्यापैकी पैशानुळे

सर्व मुलांनी काम करावे असा आग्रह वडील धरतात. याचा परिणाम सर्व भावंडे नापास होण्यात होतो. पण जमलेल्या पैशामुळे वडिलांची निर्दोष तारीख तुटते. त्यामुळे सर्व कुटुंबाला आनंद होतो. त्यानंतर सर्वजन घरी येतात. अशी अनेक लहान-मोठी संकटे हे कुटुंब झेलतच असते. पण चोरीचा आळ त्यांच्यावर येणे पूर्णपणे बंद झालेले नसते.त्यामुळे भितीने त्यांचे पलायनही बंद होत नाही. त्यानंतर लेखक भाऊ तुकारामसोबत पाचगणी येथे कामाला जातो. तेथिल निसर्गरम्य वातावरणाने, दृश्याने भाराऊन ते जातात. तसेच तेथिल थंडी, वारा, पाऊस अशा असय्य वातावरणामध्ये ते काम करतात. तेव्हा भाऊ मध्येच सोडून गावी जाण्यामुळे लेखक हळवा बनतो. तरीही मनाशी निर्धार कायम ठेवतो. तिथेही त्याचा मानसिक छळ होत असे, तशाही परिस्थितीत तो स्वावलंबी बनण्याची जिद्द अंगी बाळगतो. तेथे पाडळेसरांसोबत संगीताशी त्याचे नाते जडते. नंतर तेथेच दुसरीकडे नोकरी करू लागतो. तेथे पाडळसरांसोबत, नेपाळच्या गुरख्यासोबत, भिल्लारगावातील मुली-स्त्रियांनी दिलेली स्नेहाची वागणूक इ. आठवणी मनामध्ये ठेऊन लेखक घरी परततो. आपल्या भावंडांना तेथील लोक किती कष्टाळू आहेत हे सांगून शिकण्याचा संदेश देतो.

मित्र रतन टिळेकर याच्या सल्ल्यानुसार लेखक टिळेकरवाडीत स्वत: छपराचे घर बांधून भाडोत्री म्हणून राहतो. नव्या जीवनाची सुरूवात होईल या आशेने प्रपंच करू लागतो. लेखक स्वत: दिसायला सुंदर असल्यामुळे भावांच्या लग्नामध्ये अडथळे येत असतात. लेखकाचा भाऊ जेमतेम शिक्षणावर नोकरीचा शोध घेतो. पण त्याला नोकरी मिळत नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे म्हणून लेखकाचे मन बंड करून उठते. लेखक स्वत: आपला मावस भाऊ नटवर शिंदे यांच्या सहाय्याने पारधी संघटना स्थापन करण्याचे स्वप्न पाहतो, पण त्याचे ते स्वप्न स्वप्नच राहते. लेखक पारधी आहे हे सांगताच लोक त्याला पारधी लोकांनी केलेले

गुन्हे ऐकवत असत. पण लेखक अंत:करणाने सांगतो की सर्वच पारधी चोर नसतात. केवळ गुन्हेगारीचा शिक्का बसल्यामुळे सर्वांना गुन्हेगार म्हटले जाते. पण असा शिक्का नसलेल्या जातीचे लोक खुलेआम चोऱ्या करतात पण त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. हे असे का घडते याचा जाब वाचकांना विचारतो.

देवदास टिळेकरांनी सांगितल्याप्रमाणे लेखक नोकरीसाठी अर्ज करतो. आणि त्याला म. गांधी विद्यालयात सेवक पदाची नोकरी मिळते. ती टिकवण्यासाठी तो धडपड करू लागतो त्या कालावधीत लेखक अनेकांची आत्मचरित्रे वाचतो. ती त्याला प्रेरणादायी ठरतात. नोकरीमुळे त्याच्या जीवनात बदल होतो आणि सुखी जीवन जगत असल्याचा आनंद होतो. त्या विद्यालयाचे ऋण तो मानतो तसेच महात्मा गांधी विद्यालयाचे संस्थापक स्वर्गीय मणिभाईंबद्दल मनात आदर निर्माण होतो. तेथील निसर्गातच त्याला 'निधर्मी' हा कवितासंग्रह स्फुरतो. दोन वर्षही होतात, एवढ्यात त्याला नोकरी मध्ये स्थगिती दिली जाते. तेव्हा लेखक निराश होऊन मन उन्मळून पडतो. त्यावेळी शाळेतील वरिष्ठ शिक्षक, शिपाई आणि इतर हितचिंतक सचिवांना भेटतात. तेव्हा सर्व शिपायांना सेवेत कायम केले जाते. शाळेमध्ये नोकरी करत, पैशाची व्यवस्था लावत लेखकाचा विवाह व्यवस्थितपणे पार पडते. पण लेखकाची पत्नी समजूतदार नसल्यामुळे तिच्यावर राग काढणे, विणवण्या करणे, सासरच्या व्यक्तिंमध्ये मतभेद होणे, भांडणतंटे, प्रसंगी लेखक घटस्फोट घ्यायला तयार होतो. पत्नी नेहमीच माहेरी असल्यामुळे निराशावस्थेत लेखक मद्याच्या आहारी जातो. त्याच्या या समस्येची चर्चा सर्वत्र होत असल्याने तो खचून जातो. सर्वत्र चेष्टेचा विषय बनतो. या प्रकरणाची चर्चा काही लोक चवीने चघळत असतात. कधी मोठा भाऊ बापूच्या अवस्थेवर लेखकाला रडू कोसळते तर कधी अत्यंत बिकट परिस्थितीत कुटुंब सावरणाऱ्या बहिण गोदाचाही कोठे शोध लागत नसल्यामुळे लेखक वैतागतो. लहानपणापासू खूप कष्ट करूनही लेखकाला



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वैवाहिक सुख लाभत नाही. त्याच कालावधित तो प्रेमगीत, गवळणी, सामाजिक कविता लिहू लागतो. या कालावधित तो आपला निधर्मी हा काव्यसंग्रह प्रकाशित करतो. आकाशवाणीवर काव्यवाचनाचे कार्यक्रम होतात, वर्तमान पत्रामध्ये फोटो येतात. याचा अनुकूल परिणाम होईल असे लेखकाला वाटते. पण याचा उलटा परिणाम होऊन एवढे श्रीमंत झालेत म्हणून लेखकाच्या वडिलांना पंचक्रोशीत कोणी धान्य वाढत नाही. याचा राग वडील लेखकावर व्यक्त करतात. त्यानंतर समाजसेवक रविंद्र भोळे त्या काव्यसंग्रहाला 'राष्ट्रसेवा पुरस्कार' देण्याची घोषणा करतात.

तेथून पुढे लेखक पारधी समाजावर झालेले अत्याचार कादंबरीमध्ये मांडतो तसेच हे अत्याचार कमी होण्यासाठी स्वतःच्या समाजाला, पोलिसांना काही उपाययोजना सूचवतात. आपले विचार लेखक समाजामध्ये मांडू लागतो. त्यासाठी पैसा, वेळ, गावोगावी भटकणे हे ओघानेच येते. अशावेळी समाजासाठी तो कर्ज काढतो. शतकानुशतके पारध्यांवर जे अन्याय, अत्याचार झाले याची नोंद लेखक तपशीलासह देतात. पारध्यांचा इतिहास ते प्राचीन युगापासून ते मध्ययुगापर्यंत सांगतात. त्या कालावधित झालेले राजे-महाराजे, त्यांनी केलेले कायदे, पारधी जमातीच्या पोटजाती, त्यांची कार्य, वंशावळीविषयी माहिती, आपली मते, भ्रष्टाचाराने विविध क्षेत्रामध्ये आपले हात कसे पसरवले आहेत. ते पसरवण्याची कारणेही लेखक सांगतो. तसेच निष्क्रिय समाजव्यवस्थेला दोषही देतो. समाजाला डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या थोर व्यक्तिंचे आदर्श मानायला सांगतो आणि स्वतःही मानतो. आपल्या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. खबरे लोक हे आपल्यातीलच वैरी आहेत असे सांगून त्यांना शासन होणे गरजेचे आहे असे तो सांगतो. काही फौजदार, पोलिस हेही लेखकाला समाज प्रबोधनाबद्दल प्रोत्साहन देतात.

लेखकाच्या आईची प्रकृती बरी नसते त्यावेळी ती लेखकाला अनेक अनुभवी बोल सांगून आपल्या कुटुंबाचा तांडा सुधारण्यासाठी सांगते. लेखकाचा 'निधर्मी' हा काव्यसंग्रह प्रकाशित होण्यामुळे शेजारी-पाजारी, शाळेमध्ये कुत्सित बोलणे ऐकावे लागते. शाळेमध्ये जास्तच कामे लावली जातात. त्यामुळे दुःख विसरण्यासाठी तो शिक्षक व कर्मचाऱ्यांसोबत सहलीला जातो. तेथील मनोहर अशा निसर्गात आपले स्वत्व हरवतो. त्यानंतर घरातील परिस्थिती पाहून तो दुःखी होतो. तुकाराम, बापू, महादेव आणि लेखक अशा सर्व भावंडांच्या बायका कोणाला लग्नाचे द्याज दिले नाही म्हणून किंवा कोणाला मूल होत नाही म्हणून माहेरी निघून गेलेल्या असतात. नेहमीप्रमाणे आठवडी बाजारात लेखकाचे वडील अनेक अपमान सहन करत बाजार मागून आणतात. त्यांची वाट पाहणारी लेखकाची आई लेखकाचा व सूनबाईचा निरोप घेतात. कधी काळी गाईवरून प्रवास करणारे हे जोडपे सायकलवर बसून निघून जाते. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे निर्विकारपणे पाहणारा लेखक आपल्या जीवनाची ही दैना कधी संपेल या विचारातच दुःखी जीवनावर एक काव्य लिहितो. येथे हे आत्मकथन संपते.

तेथून पुढे लेखक 'दैनाचा उत्तरार्ध' देतात. त्यामध्ये ते आपल्या एकूण आयुष्याविषयी चिंतन करून आपल्या कुटुंबाची वर्तमानकालीन परिस्थिती सांगतात. गावातील काही उनाड मुलांनी लेखकाच्या भावाला गाडीवरून धडक दिल्याने तो वेडा होतो. त्यामुळे घरात समस्या निर्माण होतात. त्याच कालावधीत लेखकाचे पुस्तक प्रकाशनाचे काम चालू असते. अहमदनगरमध्ये पारधी समाजाच्या एका लग्नामध्ये झालेली भांडणे, तेथील किळसवाण्या गोष्टी यांचा लेखकाला उबग येतो. एका मेळाव्यामध्ये तो पारधी लोकांना जुने रितीरिवाज, अंधश्रद्धा, समजुती सोडण्याचा उपदेश करतो. आणि आपले पूर्वज समशेरसिंग भोसलेंचा पराक्रम तसेच इंग्रजांची कारस्थाने, आर्य-अनार्यांचा इतिहास, व पारधी जमात ही प्राचीन

काळातील पहिली जमात असून सर्व प्रकारच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांमध्ये अग्रभागी असल्याने त्यांचा पराक्रम तो मांडतो. आजच्या समाजातील भ्रष्टपणा व दुजाभावपणाही पुढे मांडतो.

अशाप्रकारे १९९३ ते २००३ या दहा वर्षाच्या कालखंडात 'दैना' या आत्मकथनात्मक कादंबरीमध्ये मांडला आहे. या कादंबरीचा मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा पार पडतो. प्रकाशनानंतर भावकी दुरावते तर जातभाई जवळ करतात. अनेक मित्र, पोलिस वर्ग पुस्तकाच्या प्रति खरेदी करून लेखकाला सहकार्य करतात. भाऊ नामदेव याला पुस्तक खपाच्यावेळी अनेक बरे-वाईट अनुभव येतात. तेथून पुढे लेखक दर रविवारी भटक्या-विमुक्तांना उपदेश करण्यासाठी, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी, तसेच या अज्ञानी समाजात. दैना या आत्मकथनाला 'अण्णा भाऊ साठे' पुरस्कार मिळताच त्यांच्या आनंदाला पारावार उरत नाही. नंतर ठिकठिकाणी लेखकाचा गौरव केला जातो. त्याला अनेक पुरस्कार मिळतात. या आनंदात पत्नीही सहभागी होते. असाच स्नेह नेहमी सर्वांशी राहो असे म्हणून लेखक दैनाचा उत्तरार्ध संपवतात.

**घटनाप्रसंग :-**

घटनाप्रसंगांना कादंबरीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. आशयसूत्राचा विस्तार करण्यासाठी घटनाप्रसंगांचा उपयोग होत असतो. सामान्यत: कादंबरीचा कथनव्यवहार, स्पष्टीकरण, भाष्य याक्रमाने घटनाप्रसंगांची मांडणी केली जाते. याचे वर्णन 'वकिल्या पारधी' तील घटनाप्रसंगांची मांडणी करताना आलेलीच आहे. सामाजिक जीवनातील अनेकविध जीवनानुभव घटनाप्रसंगातून मांडलेजातात. 'दैना' ही कादंबरी वकिल्या पारधी प्रमाणेच पारधी जमातीच्या व्यथा-वेदनांशी निगडीत आहे. शोषक आणि शोषित अशा जाणिवांनी या कादंबरीचा आंतरपट उलगडत

गेलेला आहे. सामान्यत: घटनाप्रसंगातून हे द्वंद्व कादंबरीकाराने उभे केलेले आहे. त्यातील काही महत्त्वाचे घटनाप्रसंग खालीलप्रमाणे असून याद्वारे सामाजिक अनुभवांची भिषणता प्रत्ययास येऊ शकते.

१. लेखकाचे वडील हे नेमुन दिलेल्या गावाबरोबर अनेक गावात मागून खातात. याचा राग लेखकाच्या मामाला असतो. आणि त्याचा सूड घेण्यासाठी ते लेखकाच्या वडिलांचा खून करण्यासाठी सोबत दोन-तिन मेहुणे घेऊन येतात. पण घरातील कुत्र्याच्या भुंकण्यामुळे व त्याच्या चाव्यामुळे खुनाचा प्रयत्न फसतो. त्या नंतर मामा आपल्या मेहूनीवर लेखकाच्या वडिलांनी अतिप्रसंग केल्याचा आरोप करून त्यांना अटक करण्यास भाग पाडतात. लेखकाच्या वडिलांना अटक होण्याचा तो पहिलाच प्रसंग असतो.

२. लेखकाचा भाऊ बापू याने चोरी केली म्हणून सर्व गाव गोळा होते व त्याचा शोध घेत लोक काठ्या-कुऱ्हाडी घेऊन घरी येतात. घरी असलेल्या लेखकाला भावाला व वडिलांना नेऊन चावडी मध्ये कोंडतात. त्यांना शिव्या देतात, गलिच्छ बोलतात, थुंकतात, हेटाळणी, अपमान, शेण फेकणे असे प्रकार करून तिघांना फाशी द्यावी अशी सरपंचांना विनंती करतात. त्यानंतर बापुला ताब्यात देण्याचे आश्वासन घेऊन सरपंच त्याना गाव सोडण्यास भाग पाडतात. त्यामुळे भितीने सर्वच कुटुंब रेल्वेतून पळ काढते.

३. नारायण सुर्वे या व्यक्तीच्या घरातील लग्नसमारंभ प्रसंगी लेखकाचे वडील आपल्या मुलांसोबत जेवण करतात. घरी आईला जेवण घेण्यासाठी मुलांना उष्ट्या पत्र्यावळ्यावरील उरलेले अन्न गोळा करण्यास सांगतात. परंतु त्याआधीच उंग्या या व्यक्तिची मुले त्या अन्नावर तुटून पडलेली असतात. तेव्हा त्यासाठी बहिण गोदाची भांडणे लागतात. एकमेकांमध्ये शिवीगाळ होते, मारामारीपर्यंत प्रकरण जाते.

४. पोलिसांचे नेहमी लेखकाच्या घरी येणे आणि वडिलांना किंवा भावाला पकडणे असे प्रकार खूप वेळा घडतात. असाच प्रसंग एके दिवशी घडतो. पोलिस मागे व आई पुढे पळते, वडील काटवनात पळून जातात, आई ऊसामध्ये लपून बसते, बापू-शेलार मळ्यात लपतो, तर लेखक लिंबाच्या झाडावर चढून बसतो. तेव्हा पोलिस सर्वत्र शोध घेऊन घरामध्ये असणाऱ्या लहान भावाला घेऊन जात असतात. तेव्हा शेजारील व्यक्ती त्याला पोलिसांपासून सोडवते.

५. लेखक व त्याची भावंडे भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठी शाळेला दांडी मारून कुसेगावातील जत्रेला पंधरा कोस पायी जातात. जत्रेला जमलेली अलोट गर्दी, बैलगाड्या देवाच्या मूर्तीविषयी काही समज -गैरसमज, रामोशी, महार, मातंग इ. चा काठी खेळण्याचा प्रसंग, खेळताना मुडदा पडणे, तो मुडदा घेऊन पळत सुटणे, त्याला जिवंत करण्यासाठी लोकांचे वारे घालणे, ओरडणे, बकऱ्यांची लागलेली रांग, तेथे जेऊन रात्री तमाशासारखे प्रसंग ही भावंडे कुतूहलाने पाहतात.

६. शाळेतील आव्हाड गुरुजींच्या 'स्वच्छ रहा' या सल्ल्याप्रमाणे लेखक व त्याची भावंडे रोज कॅनॉलवर आंघोळीला जाऊ लागतात. एके दिवशी त्यांचा भाऊ बापू हा भोवऱ्यामध्ये सापडतो. पाच मिनिटांनी बेशुद्धावस्थेत तो पाण्याबाहेर फेकला जातो. तेव्हा भितीने झालेली सर्वांची अवस्था या प्रसंगातून वर्णिली आहे.

त्याचप्रमाणे काही गौण घटनाप्रसंगही आहेत.

१. लेखक व त्याचे भाऊ लहान असताना घरातील तांब्या-पितळेची भांडी घेऊन दूर अशा ठिकाणी एका व्यक्तिला विकण्याचा प्रयत्न करतात. रडवेल्या अवस्थेमध्ये सर्वजन सुखरूप घरी पोहोचतात.

२. गुप्तधनाच्या आशेने लेखकाला अनेक गोष्टी कराव्या लागतात. देवऋषी शोधणे, त्यांनी सांगितल्याप्रमाणे होम, पुजा करणे, खड्डा खोदने त्यासाठी लागणाऱ्या

खर्चासाठी मित्र रतन टिळेकर याला आपली अंगठी विकावी लागणे. आणि हाती काही न लागल्यामुळे शेवटी निराशा येते.

३. एका लमान समाजातील मुलीवर एक अभियंता अतिप्रसंग करत असतो. त्याचा मित्र त्याला त्यासाठी मदत करत असतो. तेव्हा लेखक आणि त्याचा भाऊ त्यांना मारहाण करून त्या मुलीची सुटका करतात.

४. लेखकाचा मोठा भाऊ बापु याची पत्नी घारी हिच्या लग्नाचे द्याज दिले नाही म्हणून तिकडचे लोक बापूला मारतात. तेव्हा लेखकाचा भाऊ तुकाराम व त्यांच्यामध्ये मारामारी होते.

५. लेखकाचा भाऊ नामदेव कामास कंटाळून डोंगरावर परतत असताना दोन हिंस्र लांडगे त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात.

६. शेजारील व्यक्तिच्या घरी चोर दगडफेक करतात आणि त्याचा आरोप लेखकाच्या वडिलांवर येतो. तेव्हा जेवणाच्या ताटावरून वडिलांची व भावंडांची झालेली पळापळ.

७. पूर्वी कधीही न अनुभवलेल्या वीस मिनिटांच्या गारपीठामुळे निसर्गात व लेखकाच्या घरी घडलेला प्रसंग. इत्यादी प्रसंगांनी ही कादंबरी परिपूर्ण झाली आहे.

**व्यक्तिरेखा :-**

'दैना' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी असून या कादंबरीतील व्यक्तिरेखा वास्तव जीवनातील असून त्या व्यक्तिरेखांच्या सान्निध्यात कादंबरीकाराच्या आयुष्याची जडणघडण झालेली आहे. त्याचबरोबर त्या कादंबरीचे कथानक, घटनाप्रसंग यांना अधिक परिणामकारक करण्यात या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा हातभार लागलेला आहे. दारिद्रय, अवहेलना आणि गुन्हेगारीच्या आरोपाखाली होत असलेली कुचंबना, यामुळे पीचलेल्या मनाची व्यक्तिचित्रणे जशी या कादंबरीत

आलेली आहेत तसेच, गुन्हेगारीची पार्श्वभूमी नसलेले गावकरी आणि पोलीस यंत्रणेतील खलनायक, इरसाल पात्रांच्या जोडीला सोशिक, समंजस अशा व्यक्तिरेखांनी ही कादंबरी साकार झालेली आहे. यातून पात्रांचे विविध स्वभाव, वैशिष्ट्ये साकार झालेली आहेत. सुसंस्कृत समाज आणि समाजहीन वर्तन एका बाजूला तर दुसरीकडे गरीबी, लाचारी, उपासमारी, अवहेलना होऊनही माणूसपण जपणाऱ्या व्यक्तिरेखांचे काही नमूने या कादंबरीत साकार झालेले आहेत. या व्यक्तिरेखा दोन संस्कृतीतील अंतर्विरोध स्पष्ट करताना दिसतात. त्यापैकी काही व्यक्तिरेखांच्या स्वभाववैचित्र्याचा थोडक्यात विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

१. भास्कर भोसले :-

आत्मकथनाचे लेखक भोसले ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. घरामध्ये लाल्या हे नाव असून सुंदर तसेच नीटनेटके राहण्याची आवड असलेले, असत्याबद्दल तिटकारा, स्वत:च्या जमातीबद्दल आपुलकी व्यक्त करणारे, भ्रष्ट समाजव्यवस्थेबद्दल रोखठोक सवाल करणारे शीघ्रकवी, तारुण्यामध्ये संयम ठेऊन स्वत:च्या वहिनीला तिच्या चंचलपणाविषयी समज देणारे, स्वत:च्या पत्नीच्या आधाराची इच्छा बाळगून असणारे, पारधी जमातीतील परंपरेविरूद्ध वाट चोखळणारे व त्याच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असणारे, आपल्या जमातीवरील शिक्का पुसण्यासाठी स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणणारे, स्त्रियांविषयी आदर बाळगणारे प्रामाणिक असे व्यक्तिमत्व व्यक्त झाले आहे.

२. ज्ञानबा भोसले :-

लेखकाचे अथवा नायकाचे वडील होत. पाटसचे जावई, पारधी जातीतील असूनही चोऱ्या न करणारे व मुलांनाही तशीच शिकवण देणारे, पोलिस येताच न भिता सामोरे जाणारे, शिळे-पाके तुकडे खाऊनही जाडजूड असणारे, 'आलो रे...' ची आरोळी ठोकून संपूर्ण गावाची राखण करणारे व त्याऐवजी बलुत्याची अपेक्षा

ठेवणारे, लोकांचा अपमान सहन करून, पोलिसांचा नाहक मार खाऊन, दारिद्र्यातही मुलांना शिकवणारे व त्यांना भविष्यात मोठे होण्याची प्रेरणा देणारे, आपल्या बंधुंच्या सुखामध्ये सुखावणारे, अज्ञान-अंधश्रद्धा अंगी बाळगणारे असे व्यक्तिमत्व होय.

३.शेवराई :-

लेखकाची आई असून आपल्या पतीला भोसल्या म्हणून हाक मारणारी, देवादिकांवर विश्वास ठेवणारी अडाणी स्त्री, आपल्या मुलांनी फौजदार व्हावे अशी इच्छा बाळगते. पोटासाठी झगडा चालू असताना आपल्या मुलाला मंगळसूत्र मोडून काव्यसंमेलनासाठी पैसे देणारी, जन्मभर पतिव्रता म्हणून नावलौकिक असणाऱ्या, अहोरात्र कष्ट करणाऱ्या आईला आयुष्यभर नैराश्य भोगावे लागते.

४.गोदा :-

लेखकाची मोठी बहीण, तरुण, सुंदर व निटस वागणे-बोलणे असे तिचे वर्णन लेखकाने केलेले आहे. निर्भीड असून नियतीपुढे सामना करणारी, कठीन प्रसंगी लहान भावंडांचे पालन-पोषण करणारी, भावांसाठी अब्रुचीही पर्वा न करणारी, शिक्षित असूनही भिक मागताना न लाजणारी, वासनेची शिकार बनलेली व नंतर अविवाहीत राहण्याचा निर्णय घेणारी, पुढे घरच्या परिस्थितीमुळे दुर्लक्ष झाल्याने बेपत्ता होते.

५.बापु :-

लेखकाचा मोठा भाऊ, रंगाने काळासावळा पण छातीने रुंद, भेदक नजर, लाल डोळे अन् रुबाबात चालणारा, खोडकर आणि धुसमसुळ्या स्वभाव असणारा, दनकट शरिराचा पुढे खूप मोठ्या चोरीचा आळ येऊन गावाकडून त्याला तडीपार केले जाते. व नंतर बायकोमुळे अत्यंत वाईट अवस्था प्राप्त होते.

६.टाकमामा :-

लेखकाचे मामा, त्यांच्या वडिलांचे आवडते मेहूणे, चमत्कारी, बिलंदर व्यक्तिमत्व, दाढी वाढलेली मळका न धुतलेला शर्ट, लुंगी गुंडाळून गोसाव्याप्रमाणे दिसणारे, करणी तसेच जादुचे प्रयोग करणारे, स्वत:ची आई व बहीण यांच्यात वितुष्ट निर्माण करणारे, अचानक रात्री आजारी पडून मरण पावतात.

७.सिगारेट मामा :-

लेखकाच्या मामापैकी एक, दाढी-मिशा वाढलेली, मिस्कील हसवणारे, आपल्या मुलासाठी लेखकाची बहीण गोदास मागणारे, मधूनच कैकाडी, घिसाडी आणि इंग्रजीही बोलणारे, लेखकाच्या वडिलांशी मतभेद करणारी एक व्यक्तिरेखा.

८.बेस्टा मावशी :-

लेखकाची मावशी, आपल्या भावाची लेखकाच्या वडिलांनी हत्या केली असा समज करून कड्याक्याचे भांडण करणारी व कठीन प्रसंगी त्यांना आधार देणारी व्यक्तिरेखा आहे.

९.रतन टिळेकर आणि त्याचे कुटुंब :-

रतनची आई-ताराबाई, वडिल-शिवाजी, दोन बहिणी एक भाऊ असे सुंदर कुटुंब होते. रतन हा लेखकाचा जिवलग मित्र, एका सधन शेतकऱ्याचा मुलगा असूनही भेदभाव न करणारा, लेखकाच्या चुका माफ करणारा, त्याला आधार देणारा, योग्य उपदेश करून अनेक समस्यांमध्ये मार्गदर्शन करणारा. रतनची आई लेखकावर मुलाप्रमाणे प्रेम करणारी, अंतर न ठेवणारी, लेखकाच्या दूर जाण्याने कासावीस होणारी, रतनची बहिण बिन्ना ही देखील लेखकाला भाऊ मानून राखी बांधते.

१०. शोभा :-

लेखकाची पत्नी, लेखकाला मानसिक त्रास देणारी, पडत्या काळामध्ये साथ सोडणारी, त्याला सजून न घेणारी, माहेरची ओढ असणारी अशी व्यकितरेखा.

११. सदु आजोबा :-

भोसलेंच्या आईचे वडील, पूर्वी महाराष्ट्रातील पारध्यांचे पाटील असणारे, खुप श्रीमंत असले तरी भिक मागून खाणारे, पाच पंचांपैकी एक, जात-पंचायतीचे शेवटचे पाटील, उतारवयात थकलेले.

याशिवाय दुय्यम व्यक्तिरेखांमध्ये पुढील व्यक्तिरेखा येतात.

**लेखकाचे नातेवाईक -**

तुकाराम - लहानपणी अनेक खोड्या करणारा लेखकाचा भाऊ, महादेव - बुलडोझर सारखी ताकद असणारा भाऊ, अनिल - आजोबांच्या वळणावर गेलेला, वयापेक्षा दुप्पट दिसणारा लहान भाऊ, अनिता - लहानपणी काविळीने वारलेली बहिण, राजश्री - सुंदर असून अंध असलेली बहिण, नामदेव - लेखकाला नेहमी साथ देणारा भाऊ, याशिवाय घारी - बापू या भावाची पहिली चाहटाळ नक्षत्रासारखी सुंदर पत्नी, भाऊसाहेब-हे लेखकाचे चुलते, जयसिंग भोसले - बोलण्यामध्ये पटाईत असणारे हे लेखकाचे चुलते, चतुर काळे - लेखकाचा फौजदार असलेला मामा, ग्रॅज्युएट असून टी.बी झाल्यामुळे नोकरी सोडलेला, तसेच लेखकाचा शायडी मामा, मदुमामा, उरक्या - टाकमामाचा मुलगा, टमटम - चुलतभाऊ, हारु, सारिका मावशी, लेखकाच्या आत्या - सारा, तिरथा, राकेश - लेखकाचा मेहूणा, छल्ला - मेहूणी, अद्रक - लेखकाच्या पत्नीची चंचल मावशी, लेखकाच्या सर्व मावशांना जमिन देऊन आईला उपरीच ठेवणारी लेखकाची धोंडी आजी अशा व्यक्तिरेखा या कादंबरीत आहेत.

**लेखकाचे शेजारी -**

विष्णु होळकर - लेखकाच्या वडिलांनी न विचारता कडबा घेतल्यामुळे त्यांना मारहान करणारे, निळकंठ व आबा - त्यांचे गडी, नागनाथ शेलार - विचित्र इसम, नारायण शेलार व देवराम शेलार - कधीकाळी लेखकाच्या वडिलांना मदत करणारे, जितके चांगले तितकेच वाईट असणारे, मल्या - शेलार मळ्यातील लेखकास भाकरी देणारी एकमेव भली व्यक्ती, आप्पासाहेब - कारस्थानी सरपंच, दत्तोबा शेलार - सैन्यामध्ये नोकरी केलेले, जातीभेद न पाळणारे, तरुणांमध्ये आदराचे स्थान असणारे, दिपककाका भट्ट - दारूच्या भट्टया असणारे, बबनदादा फडके - घरावर झालेल्या दगडफेकीचा आरोप लेखकाच्या वडिलांवर करणारे, शिंदे मामा - भजन म्हणणारे, ताराचंद होले - हुशार, बेरकी, कळीचा नारद, भाऊसाहेब राजे - लेखकाच्या भाऊ व वडिलांना जामीन होणारे, अप्पा पिरूभाऊ- कानगावातील सरपंच  तसेच आनंदराव चिरमे, पांडुतात्या, मधुमामा शेळके, धोंडिबा कोंड्या, नाना चौधरी, मच्छिंद्र हा गावकरी, लक्ष्मण वाणी, सुनंदा- लेखकाची मैत्रिण सुंदर असणारी, चपळाईने काम करणारी, मोकाशी - लेखकाच्या वडिलांसारखीच असणारी व्यक्तिरेखा, तसेच पारधी जमातीतील सनिता भोसले, वैशाली काळे या पीडीत स्त्रिया

**लेखकाला लहानपणी शिकवणारे शिक्षक :-**

लेखकाला पहिलीच्या वर्गात शिकवणारे काकडे व सोनवणे गुरूजी, मार न देता चिमटा घेणारे आव्हाड गुरूजी, क्रिकेट व कुस्त्यांबाबत प्रोत्साहन देणारे पानसरे गुरूजी, पाटसमधील शाळेतील जाधव सर आणि बाई, गणित विषय पोटतिडीकीने शिकवणाऱ्या प्रेमळ पाटील बाई, हिंदी विषय शिकवणारे म्हस्के सर या काही व्यक्तीरेखा कादंबरीत आलेल्या आहेत.

**लेखकाचे शेजारील व शाळेतील मित्र :-**

सुन्या आणि कचऱ्याचा नाग्या, बार्शीकरचा मल्या, ताह्या, संद्या, त्याचबरोबर गोऱ्या, हण्या, भजन म्हणणारा दत्तु कांदे व शाळेतील श्री. जगन्नाथ बुधवंत, रोहिदास इ. मित्र

**लेखकाच्या कुटुंबाला त्रास देणारे पोलीस :-**

डोके हवालदार - त्यातील वडिलांचे मित्र बनलेले व त्यांचा उपयोग चोरांना पकडण्यात करणारे, महाशब्दे हवालदार - लाचलुचपतकार, अरेरावी करणारा, यम, लंके व कांबळे पोलीस - पान खाऊन डोळ्यांवर गॉगल चढविणारे, पानसरे पोलिस - लहान मुलांनाही दम भरणारे,

त्याचप्रमाणे सुगंधाबाई - उतारवातही देवऋषीपण करणारी सुंदर स्त्री, मांगल्या पारधी- भिल्ल पारध्यांच्या तांड्यातील अट्टल दरोडेखोर, भाऊसाहेब सोनवणे - लेखकाच्या वडिलांसोबत दारू घेणारे, रामदास आव्हाड - पोलिसपाटील, रंगनाथ गायकवाड - आईचे गरू, जांबूत गावचे देवऋषी, पाडळे सर - भारती विद्यापीठातले संगित मास्तर, व त्यांचा जोडिदार बापु बगाडे, शिंदे ठेकेदार - लेखकाला त्रास देणारे ,

**लेखकाला प्रेत्साहन देणारे महात्मा गांधी विद्यालयातील हितचिंतक व इतर :-**

वेदपाठक बाई - म.गांधी विद्यालयातील प्राचार्या, कोचेटा व खिरे सर - लेखकाची नोकरी वाचविण्यासाठी प्रयत्न करणारे, तसेच जीवन किर्लोस्कर, दादा लोणकर, देवदास टिळेकर, अरविंद खिरे सर, रा.धो.कांचन, राजेंद्र टिळेकर, प्रा.के.डी.कांचन, राऊत साहेब, आर.डी.कांबळे, सौ.जाधवबाई, सौ.अलका परदेशी, सत्यवान जगताप, शाळेतील वरिष्ठ शिक्षक व शिपाई - बोरावके सर, महादेव कांचन, अविनाश गायकवाड - पारधी समाजासाठी झटणारे कवी, पत्रकार, व 'कर्मभूमी' चे संपादक, डॉ. संजय भागवत-लेखकाशी स्नेह जुळवणारे, डॉ.गोविंद गोरे -

लेखकास जमातीच्या इतिहासाविषयी मार्गदर्शन करणारे, जंगली भोसले - लेखकास सन्मानाने लग्नकार्य सोहळ्यास बोलावून स्नेह वाढविणारी व्यक्ती. त्याचप्रमाणे इन्सपेक्टर काटकर साहेब, हवालदार शेख, मा. पो. निरीक्षक - दिलीप कदम इ. लेखकास प्रोत्साहन देणारा, मदत करणारा पोलिस वर्ग.

वरील प्रमुख व गौण व्यक्तिरेखांमधून कादंबरीचा आशय अधिकाधिक सजीव झालेला आहे. कल्पनाजन्य व्यक्तिरेखांऐवजी वास्तवातील व्यक्तिरेखांनी ही कादंबरी अधिक सशक्त झाली आाहे. वस्तुत: वास्तवातील व्यकितरेखा मांडणे अधिक अवघड असते. हे कौशल्य कादंबरीकारांनी अत्यंत संयतपणे हाताळले आहे. ज्या घटना किंवा प्रसंगावर भाष्य केल्यामुळे त्या व्यक्तिच्या जीवनातील सत्य कळल्यामुळे काही अनर्थ ओढवले असते किंवा बदनामी झाली असती. कादंबरीकारांनी ती टाळण्यासाठी तो दोष भाष्य न करता एका वाक्यात संपवला आहे. असे जरी असले तरी त्या संक्षिप्त प्रतिपादनानेही त्या कादंबरीकाराचा प्रांजळपणा जाणवत असून या कादंबरीची उंची वाढली आहे.

**निष्कर्ष :-**

१. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पारधी समाज एकविसाव्या शतकात स्वत्वाचा शोध घेताना दिसतो. याचे चित्रण दैना कादंबरीतून व्यक्त झाले आहे.

२. शिक्षणामुळे आपल्यावरील अन्यायाची जाणिव झालेला हा पारधी समाज अन्यायाविरुद्ध बंड करुन उठत असल्याचे काही अनुभव दैना कादंबरीतून मांडले आहेत.

३. पारधी समाजातील स्त्रियांचे अज्ञान, जुनाट परंपरेला कवटाळणे या भ्रामक समजुतींचे चित्रण दैना या कादंबरीतून आले आहे.

४. परिस्थिती बदलली तरी पारध्यांवरील अत्याचार नाहीसे झाले नाहीत. म्हणून शिक्षणाची अपरिहार्यता दाखवून लेखक स्वत: बदलण्याची भूमिका स्वीकारतो.

५. 'दैना' ही कादंबरी समाजव्यवस्था आणि प्रशाससकीय व्यवस्थेची कशी बळी ठरली आहे याचे वास्तव चित्रित करते आहे.

६. सामाजिक अत्याचाराचे अमानवी रूप आणि क्रूरता याचे अनेक संदर्भ 'दैना' कादंबरीतून मांडले आहेत.

**संदर्भ :-**


१. वाङ.मयीन संज्ञा संकल्पना कोश/ संपादक प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके आणि इतर/ प्रकाशक- ग.रा.भटकळ/ फाउंडेशन, मुंबई/ प्र. आ-१/ पृ.१७३